दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३४२ वा | मंगळवार दि १४ एप्रिल २०२६ | पृष्ठ ८ | किमंत ३ रुपये

# सुनेत्रा पवार यांची काळजी आम्ही घेऊ; जीवाला धोका असल्याच्या पत्रावर मुख्यमंत्री नेमकं काय म्हणाले?

वृत्तसंस्था/ पुणे

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या जीवाला धोका असल्याचे पत्र आले असेल, तर त्याची राज्याचे गृहखाते चौकशी करील; तसेच सुनेत्रा पवार यांची राज्य सरकार पूर्ण काळजी घेईल. पत्राबाबतही चौकशी केली जाईल,फ अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका स्पष्ट केली. बारामतीच्या पोटनिवडणुकीत प्रमुख पक्षांनी अर्ज माघारी घेऊन सहकार्य केले असले, तरी काही जण प्रसिद्धीसाठी रिंगणात उभे असल्याची टीकाही त्यांनी या वेळी केली. पुरंदर तालुक्यातील खानवडी येथील कार्यक्रमानंतर फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. ङ्गराज्य सरकारच्या वतीने महात्मा फुले यांच्या द्विशताब्दीनिमित्त उपक्रमांना सुरुवात केली याचा आनंद आहे. खानवडी येथे जिल्हा परिषदेने अतिशय सुंदर केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची (सीबीएसई) शाळा तयार केली आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून ही शाळा तयार केली आहे. विविध प्रकारच्या प्रयोगशाळा तयार केल्या आहेत. कंपन्यांनी शाळेत येण्यासाठी मुलींना सायकली दिल्या आहेत,फ असे फडणवीस म्हणाले. महात्मा फुले यांना भारतरत्न द्यावा, यासाठी राज्य सरकारकडून कोणते प्रयत्न सुरू झाले आहेत याबाबत विचारता,महात्मा फुले यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर करण्यात यावा, याबाबत राज्य सरकारने प्रस्ताव पाठविला आहे. देशात महात्मा फुले आणि महात्मा गांधी हे दोघेच महात्मा आहे. कोणताही सर्वोच्च पुरस्कार मिळणे हे चांगलेच आहे; पण त्यांचे व्यक्तिमत्व हे पुरस्कारापेक्षा मोठे आहे,फ असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक न लढविण्याचा निर्णय महाविकास आघाडीने घेतला. मात्र, अपक्षांमुळे निवडणूक होत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी त्यांच्या पक्षाकडून आमंत्रण आलेले नाही, अशी स्पष्टोक्ती खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी केली. सुनेत्रा पवारांचा प्रचार करण्याबाबत महाविकास आघाडी म्हणून निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या मृत्यूबाबत कर्नाटक राज्यात गुन्हा दाखल होतो. वास्तविक महाराष्ट्राने दादांना न्याय द्यायला हवा होता, मात्र त्याची सुरुवात कर्नाटकातून झाल्याने तेथील सरकारचे आभार. ज्या मागण्या रोहित पवारांनी केल्या आहेत, त्या प्राधान्याने मान्य करून त्यावर अंमलबजावणी करावी.



दादांच्या मृत्यूबद्दल चौकशी सुरू झाली किंवा कसे, याबाबत माहिती नाही. दुर्घटना स्थळावरून दादांचे फोन सापडले, मग ब्लॅक बॉक्स का सापडत नाही, असा प्रश्न उपस्थित करून सुप्रिया सुळे यांनी दादांसोबत इतर पाच लोकांचा मृत्यू झाला, त्यांनाही न्याय मिळावा, अशी आमची मागणी असल्याचे सांगितले.

# शिवसेनेतील अंतर्गत धुसफूस चव्हाट्यावर, शिरसाट आणि सत्तार यांच्यात दुरावा कायम

वृत्तसंस्था/ छत्रपती संभाजीनगर

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सध्या महत्त्वाच्या घडामोडी घडत आहे. पक्षसंघटना मजबूत व्हावी यासाठी पक्षाच्या वरिष्ठांकडून प्रयत्न केले जात आहे. यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना चांगली संधी दिली जाण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे पुढचे तीन वर्षे मोठ्या निवडणुका नसल्याने आता पक्षाने पक्ष संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. याआधी पुण्यात पक्षात संघटनात्मक पातळीवर मोठ्या घडामोडी सुरु असल्याचे वृत्त समोर येत होतं. त्यानंतर आता छत्रपती संभाजीनगरमध्येही पक्ष संघटना मजबूत करावी यासाठी महत्त्वाच्या हालचाली सुरु आहेत. याच निमित्ताने एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि खासदार श्रीकांत शिंदे हे आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी महत्वाची आढावा बैठक घेतली. पण या बैठकीत पक्षाचे दोन नेते आपापसात नाराज असल्याचं चित्र बघायला मिळालं. त्यामुळे याबाबतच्या चर्चांना उधाण आलं. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आढावा बैठकीमध्ये शिवसेनेमध्ये अंतर्गत धुसफूस असल्याचे चित्र बघायला मिळाले. शिवसेनेचे माजी मंत्री अब्दुल सत्तार आणि सध्याचे विद्यमान मंत्री संजय शिरसाट यांच्यात अबोला कायम असल्याचं आजच्या



बैठकीत बघायला मिळालं. पालकमंत्री संजय शिरसाट व्यासपीठावर आल्यानंतर बाकी आमदारांनी त्यांच्यासोबत हस्तांदोलन केलं. मात्र अब्दुल सत्तार आणि संजय शिरसाट यांनी हस्तांदोलन करणं टाळलं. विशेष म्हणजे पालकमंत्री संजय शिरसाट आल्यानंतर आमदार अब्दुल सत्तार हे खुर्चीवरून उठलेही नाही आणि हस्तांदोलन देखील टाळले. दोघांच्या अबोल्यामुळे शिवसेनेतली अंतर्गत धुसफूस चव्हाट्यावर आली. पालकमंत्री संजय शिरसाय यांनी व्यासपीठावर आल्यानंतर आमदार अब्दुल सत्तार यांनी रावसाहेब दानवे यांच्या कन्या संजना जाधव यांच्यासोबत बोलणे पसंत केले. तर पालकमंत्री संजय शिरसाट हे इतरांशी बोलत राहिले. दोघांनी एकमेकांकडे बघणे आणि बोलणेही टाळले. त्यांच्या अबोल्याची सध्या राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा होत आहे. दरम्यान आढावा बैठकीनंतर श्रीकांत शिंदे यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी बैठकीबाबत माहिती दिली. या मेळाव्यात पुढे शिवसेना कशी वाढेल, यासाठी बैठक आयोजित केली आहे. पुढील तीन वर्षांत कुठल्याही निवडणुका नाहीत. त्यानुसार बैठका घेतल्या जातील. वॉर्डनिहाय नियोजित बैठका सुरू राहतील. मतदार निसटणार नाहीत, याची दक्षता घेतली पाहिजे. कार्यकर्त्यांना भेटून, त्यांचं ऐकून घेण्यासाठी ही बैठक आहे. निवडणुकीनंतर आढावा म्हणा किंवा चिंतन बैठक म्हणा, आढावा घेतलाच पाहिजे. विधानसभा निवडणुकीत मोठ्या संख्येने निवडून आलो आहोत अशी प्रतिक्रिया श्रीकांत शिंदे यांनी दिली. प्रत्येक पक्ष आपली ताकद कशी वाढेल, यासाठी प्रयत्न करत असतो. आम्हालादेखील आमच्या पक्षाची ताकद वाढवायची आहे. त्यासाठी आम्ही बैठका घेत आहोत. विधानसभा निवडणुकीपूर्वीही अशाच बैठका झाल्या होत्या आणि पुढेही घेणार आहोत. कोणताही पक्ष जिंकण्यासाठी काम करत असतो आणि आपल्या पद्धतीने काम करत असतो अशी प्रतिक्रिया देखील श्रीकांत शिंदे यांनी दिली.

# आज रोने दो हमें...



गेली आठ दशके आपण एक चमत्कार वारंवार अनुभवत आलो आहोत. वाद्यवृंदातील एखाद्या वाद्याचा स्वर हळुवारपणे सुरू होतो, मग त्या स्वरांमध्ये गुरफटून सुरांची एक धारदार कट्यार काना-मनात घुसत जाते, स्वरांचे हवेहवेसे वार करत! गीत कोणाचेही असो, संगीतकार कोणीही असो, त्यांच्या शब्द-सुरांत भिजून एखादे गाणे जेव्हा आशाताईंच्या आवाजात आपल्या कानांवर पडते, तेव्हा साक्षात्कार होतो एका दैवी प्रतिभेचा! हा साक्षात्कार तर आशाताईंच्या हजारो गाण्यांमधून पुढेही लाखो वर्षे होत राहणार आहे; परंतु भूलोकीचा हा स्वर मात्र आता अनंत अवकाशात विलीन झाला आहे. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून मिळालेला स्वरांचा वारसा मस्तकी धारण करून आशाताईंनी केलेला प्रवास सोपा नव्हता. त्यांच्या आयुष्यातली आघात आणि अपघातांची मालिका कधी संपलीच नाही. अनेक परीक्षा, अनेक कसोटीचे प्रसंग आणि संघर्षाच्या मार्गावरून प्रवास करत, आपले नाव नाव सार्थ ठरवत आशाताईंनी या आव्हानांचा सामना केला. नियतीने पदरात टाकलेल्या अपार वेदनांनी त्यांचे गाणे जणू समृद्ध केले. त्यांचे दुःख त्यांच्या आवाजातून त्यांच्या गाण्यात पाझरत गेले. व्यक्तिगत आयुष्यातील चढ- उतार, व्यावसायिक क्षेत्रातील अडचणी, स्पर्धा यावर जिद्दीने आणि चिकाटीने मात करून या स्वरसृष्टीत त्यांनी उंचीचे, मानाचे स्थान कष्टाने मिळवले. हा संघर्ष, जिद्द आणि अविरत, अपार मेहनत यातून रसिकांना मिळाला तो अनमोल गाण्यांनी शिगोशीग भरलेला, कधीही रिता होणार नाही असा सुरांचा अमृतकुंभ. आशाताईंना नायिकेचा स्वर म्हणून स्थापित करणारे ओ. पी. नय्यर यांच्यापासून ते त्यांच्या आवाजाचा पोत आणि त्याची ताकद ओळखून त्याबरहुकूम आणि केवळ आशाताईच गाऊ शकतील अशा चाली बांधणारे हृदयनाथ मंगेशकर, आर. डी. बर्मन यांच्यापर्यंत अनेकांच्या गाण्यांनी हा अमृतकुंभ भरलेला आहे. ङ्गमन ही देवता मन ही ईश्वरफ सारख्या भक्तिरसाने तुडुंब भरलेल्या गाण्यापासून ते मादकतेच्या मधात न्हालेल्या ङ्गदम मारो दममसारख्या गाण्यांपर्यंत अनेक प्रकारची गाणी आशाताई तेवढ्याच समरसतेने गायल्या. अनेक गीतकारांनी शब्दांमधून गुंफलेल्या, शंभराहून अधिक संगीतकारांच्या स्वररचनांमधून विविध भावनांचे प्रकटीकरण करत त्यांनी ही वाटचाल केली. शेकडो संगीतकार... प्रत्येकाची तऱ्हा वेगळी, ढंग वेगळा; मात्र त्या रचनांना न्याय देणारा स्वर एकच - आशा भोसले! नायिका कोण आहे, कथानक काय आहे, गाण्याची सिच्युएशन काय आहे अशा अनेक बाबींचा विचार करून त्यातील भाव नेमके गाण्यांतून व्यक्त करणे हा एक सर्वश्रेष्ठ कलविष्कार आहे. ङ्गएक सौ सोला चांद की राते, एक तुम्हारे कांधे का तीलफ मधील परिपक्व प्रेमभाव आणि ङ्गतू रूठा तो मैं रो दुंगी सनमम मधला कोवळा, अल्लड लाडिकपणा एकाच गळ्यातून व्यक्त होतो, तो केवळ अशा छोट्या छोट्या बाबींचा विचार करून ते गाणे गायल्यानेच. पार्श्वगायिका कविता कृष्णमूर्ती यांनी सुरुवातीच्या काळात ङ्गस्क्रॅच सिंगरफ म्हणून काही गाणी गायली आहे. ङ्गस्क्रॅच सिंगरफ म्हणजे एखाद्या मोठ्या गायिकेला वेळ नसेल तर ते गाणे तात्पुरते, म्हणजे चित्रीकरणापुरते गायचे. कविता कृष्णमूर्ती यांनी असे एक गाणे आशाताईंसाठी गायले होते. आशाताईंनी ते ऐकले आणि त्यांना ते खूप आवडले. मग त्यांनी ते कविता कृष्णमूर्ती यांच्याच आवाजात चित्रपटात घेण्याचा आग्रह केला. मनाचा इतपत मोठेपणा, इतकी प्रगल्भता वेदनेतून सहवेदनेकडे प्रवास झाला असेल तरच प्राप्त होते. ङ्गखाणे आणि खिलवणेफ याबाबत त्यांची जी ख्याती होती तीसुद्धा त्यांच्या मनाचा हा जो मोकळेपणा होता, त्यातून आलेली होती. त्यांच्या एकेका गाण्याविषयी, एकेका संगीतकारासोबत जुळलेल्या त्यांच्या सुरांविषयी, मराठी आणि हिंदीतील आशाताई पूर्णतः वेगळ्या वाटतात त्याविषयी आणि भरभरून जगण्याविषयी... अशा प्रत्येक पैलूवर खरे तर एक मोठा ग्रंथ लिहून होईल. आशाताईंच्या स्टेज शोंची तुलना केवळ किशोरकुमार यांच्या शोबरोबरच करता येईल. किशोरकुमार आणि आशाताई हे दोघेही स्टेजवर उत्साहाने अक्षरशः उतू जात असत. आशाताई स्टेजवर येताक्षणी सगळा आसमंत जिवंत होत असे. जगण्याचा अमाप उत्साह, विलक्षण रग त्यांच्या त्या वावरण्यात दिसत असे. स्टेजवरून खाली उतरल्यावर मात्र पुन्हा आयुष्याचे हिशेब चुकते करण्याचा सिलिसिला सुरू होई. एक लकाकता स्वर, सळसळते चैतन्य आणि ङ्गदूर तक आपके पिछे पिछे मेरी आवाज चली आएगीफ म्हणत आमच्या मनाचा ताबा घेणाऱ्या आपल्या दैवी स्वरापुढे आम्ही सगळेच नतमस्तक आहोत, सदैव नतमस्तक राहू. गीतकार भरत व्यास यांनी लिहिलेल्या एका गाण्याच्या ओळी आशाताईंनी आपले जीवन गीतफ म्हणून स्वीकारल्या होत्या...







*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पहिली फेरी अनिर्णित; 47 वर्षांनंतर थेट चर्चा, होर्मुझ सामुद्रधुनीच कळीचा मुद्दा

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील संघर्षावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात इस्लामाबादमध्ये थेट वाटाघाटी सुरू झाल्या आहेत. दोन्ही देशांमध्ये १९७९ नंतर पहिल्यांदाच अशा प्रकारची चर्चा होत असल्याने अवघ्या जगाचे याकडे लक्ष लागले आहे. चर्चेच्या पहिल्या फेरीत, शनिवारी कोणताही मुख्य तोडगा निघू शकला नसला तरी, होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रण हा वाटाघाटीत कळीचा मुद्दा असल्याचे सूत्रांनी सांगितले.

अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स, विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे जावई जॅरेड कुश्नर यांच्याबरोबर इराणच्या पार्लमेंटचे अध्यक्ष मोहम्मद बागेर घालिबाफ आणि परराष्ट्रमंत्री सयद अब्बास अराघची यांच्यात दोन तास चर्चा





झाली, अशी माहिती पाकिस्तानातील एका सूत्राने दिली.

या चर्चेत काय झाले याबाबत अधिकृत माहिती मिळू शकली नाही. मात्र, इराणमधील माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण आणि इराणच्या गोठवलेल्या संपत्ती मुक्त करणे, युद्धाची नुकसान भरपाई आणि संपूर्ण पश्चिम आशियात शस्त्रसंधी लागू करणे अशा प्राथमिक अटी इराणने घातल्या आहेत. या चर्चेदरम्यान पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर हेही उपस्थित होते. दोन्ही देशांतील चर्चा रविवारीही सुरूच राहील, असे सांगण्यात आले.

शाहबाज शरीफ यांनी दोन्ही बाजूंशी स्वतंत्र चर्चा केली. या भेटीमध्ये संभाव्य वाटाघाटींची वेळ आणि पद्धत या बाबी निश्चित करण्याविषयी चर्चा झाली, असे वृत्त पाकिस्तानी माध्यमांनी दिले. इराणने आपल्या महत्त्वाच्या अटी शरीफ यांना सांगितल्या आहेत. इराण लेबनॉनमध्येही युद्धविरामाची मागणी करत आहे. इस्रायल आणि लेबनॉनचे अधिकारी मंगळवारी वॉशिंग्टनमध्ये याबाबत चर्चा करणार असल्याचे सांगण्यात आले.

चर्चा सुरू झाली तेव्हा काय करार झाले याबद्दल परस्परविरोधी माहिती समोर येत होती. इराणच्या एका वरिष्ठ सूत्राने वृत्तसंस्थांना सांगितले की, अमेरिकेने इराणची कतार आणि इतर परदेशी बँकांमधील गोठवलेली संपत्ती मुक्त करण्याचे मान्य केले आहे. पण अमेरिकेच्या अधिकाऱ्याने तातडीने या दाव्याचे खंडन केले. कतारच्या परराष्ट्र मंत्रालयाने यावर तातडीने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

**चर्चेदरम्यान गंभीर मतभेद**

सामुद्रधुनी खुली करण्यावरून गंभीर मतभेद असल्याचे वृत्त इराणच्या निमसरकारी माध्यमांनी शनिवारी दिले. या चर्चेत तोडगा निघू शकला नाही, असे या माध्यमांनी सांगितले.

इराणी लोकांना हे लक्षात येत नाही की, आंतरराष्ट्रीय जलमार्गाचा वापर करून ते अल्पमुदतीसाठी जगाकडून खंडणी वसूल करण्याशिवाय त्यांच्याकडे वाटाघाटी करायला मुद्दे नाहीत. ते केवळ वाटाघाटी करण्यासाठी जिवंत आहेत!

## इराणच्या मदतीने किंवा मदतीशिवाय होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणारच

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

अमेरिका-इराण यांच्यात युद्धविराम झाले असले तरीही इस्रायल लेबनॉन युद्धामुळे होर्मुझची सामुद्रधुनी अद्यापही जलवाहतुकीसाठी खुली करण्यात आलेली नाही. त्यामुळे जागतिक पातळीवरील पुरवठा साखळी अद्यापही विस्कळीत झाली आहे. दरम्यान, यामुळे कोणत्याही परिस्थितीत होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणार असल्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिलाय. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, इराणच्या सहकार्यासह किंवा त्याशिवाय वॉशिंग्टन लवकरच 'होर्मुझची सामुद्रधुनी' (Strait of Hormuz) खुली करेल. मात्र, त्यांनी आपल्या विधानावर अधिक भाष्य केले नाही, पण हे पाऊल उचलणे सोपे नसेल याचीही कबुली दिली.

मेरीलँडमधील 'जॉइंट बेस अँड्रयूज' येथे एअर फोर्स वनमध्ये जाण्यापूर्वी ट्रम्प यांनी पत्रकारांना सांगितले की, "हे सोपे नसेल. पण मी एवढेच सांगेन की आम्ही ती सामुद्रधुनी लवकरच खुली करू." ट्रम्प यांनी असेही सुचवले की इतर देश मदतीसाठी पुढे येत आहेत, मात्र त्यांनी कोणत्याही देशाचे नाव घेतले नाही. "इतर देशही या सामुद्रधुनीचा वापर करतात. त्यामुळे इतर देश मदतीला येत आहेत आणि ते सहकार्य करतील", असं ट्रम्प म्हणाले.

इराण हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांकडून टोल (शुल्क) वसूल करणार असल्याच्या वृत्तावरही ट्रम्प यांनी प्रतिक्रिया दिली. ही आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रे असल्याचे सांगत, अमेरिका इराणला असा टोल वसूल करू देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. 'फायनान्शिअल टाइम्स'च्या वृत्तानुसार, तेहरान हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेलवाहू जहाजांवर प्रति बॅरल १ डॉलर टोल आकारणार आहे. मात्र, इराणसोबत या महत्त्वाच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण राखणाऱ्या ओमानने अशा कोणत्याही योजनेचा इन्कार केला आहे. इराण युद्ध सुरू झाल्यापासून तेहरानने ही सामुद्रधुनी रोखून धरल्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यात इतिहासातील सर्वात मोठे व्यत्यय आले आहेत. जागतिक तेल आणि लिक्विफाइड नॅशनल गॅस (LNG) वाहतुकीच्या सुमारे २० टक्के भाग या सामुद्रधुनीतून जातो. होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षित ठेवण्यासाठी नाटो (NATO) मित्रदेशांकडून मदत मिळत नसल्याबद्दल ट्रम्प यांनी नाराजी व्यक्त केली आहे. गुरुवारी ट्रम्प यांची भेट घेतल्यानंतर नाटोचे सरचिटणीस मार्क रट्टे यांनी युरोपीय सरकारांना सांगितले की, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना येत्या काही दिवसांत ही सामुद्रधुनी सुरक्षित करण्यासाठी ठोस वचनबद्धता हवी आहे. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला केला होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्रायल आणि आखाती देशांमधील अमेरिकन तळांवर हल्ले केले. अमेरिका-इस्रायलचे इराणवरील हल्ले आणि इस्रायलचे लेबनॉनवरील हल्ले यात हजारो लोक मारले गेले असून लाखो लोक विस्थापित झाले आहेत. या युद्धामुळे तेलाच्या किमती वाढल्या असून जागतिक बाजारपेठ हादरली आहे. वॉशिंग्टनने मंगळवारी तेहरानसोबत दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची घोषणा केली होती.



## पश्चिम बंगालमध्ये समान नागरीकायदा लागू करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आश्वासन

**जंगीपूर (प.बंगाल)/वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमधील घुसखोरीच्या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी तृणमूल काँग्रेसवर टीका केली आणि तुष्टीकरणाचे राजकारण संपवण्यासाठी समान नागरी कायदा (यूसीसी) लागू करण्याचे आश्वासन दिले. राज्यात बंगालींना अल्पसंख्याक होऊ देणार नाही, असेही ते म्हणाले.

मुर्शिदाबाद जिल्ह्यातील जंगीपूर येथे प्रचारसभेत बोलताना पंतप्रधानांनी आगामी विधानसभा निवडणुका या पश्चिम बंगालची ओळख आणि भविष्य वाचवण्याची लढाई असल्याचा दावा केला. तृणमूल काँग्रेसने आपला जुना 'माँ-माटी-मानुष' हा नारा सोडून दिला असून आता सत्ता टिकवून ठेवण्यासाठी सत्ताधारी पक्ष घुसखोरांवर आणि मतपेढीच्या राजकारणावर अवलंबून आहे, असे मोदी म्हणाले. ही निवडणूक केवळ सत्तापरिवर्तनापुरती मर्यादित नाही. हे पश्चिम बंगालची अस्मिता जपण्यासाठी दिलेले एक मत आहे. पश्चिम बंगालने आता आपला निर्धार पक्का केला आहे. आपली अस्मिता आणि भविष्यासाठी, पश्चिम बंगाल नक्कीच परिवर्तन घडवून आणेल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. भाजपने दोन खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न करून, दक्षिण कोलकातामधील भवानीपूर जागेवरून उमेदवारी रद्द करवून घेण्याचा



प्रयत्न केला; परंतु तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आणि जनतेने हा डाव उधळून लावला, असा दावा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शनिवारी पश्चिम मिदनापूर जिल्ह्यातील केशियरी येथील सभेत बोलताना केला. या वेळी त्यांनी भाजपवर मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रियेदरम्यान ९० लाख मतदारांची नावे मतदार यादीतून 'बळजबरीने' वगळल्याचा आरोपही केला. लोकशाही मार्गाने निवडणूक लढवून जिंकण्याची हिंमत नसल्यामुळे, कपटी मार्गांनी बळजबरीने मते मिळवण्याचा कट भाजपने रचल्याचा दावादेखील त्यांनी या वेळी केला.

## 'सर्वात मोठी बाजार समिती राज्यात निर्माण करणार'

**पुणे/वृत्तसंस्था**

'राज्य शासनाच्या 'मॅग्नेट' प्रकल्पाच्या माध्यमातून फळे, भाजीपाला,फुलांच्या विक्रीसाठी एक साखळी निर्माण करण्यात येणार आहे. जागतिक पातळीवर सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती राज्यात निर्माण करण्यात येणार आहे. जल, रेल्वे,वाहतूक, विमानतळ, तसेच महामार्गांशी ही बाजारपेठ जोडण्यात येणार आहे', अशी घोषणा राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी शनिवारी केली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेकडून मार्केट यार्ड येथे 'आंबा महोत्सव २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन रावल यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, संचालक शरद जरे, तसेच पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप या वेळी उपस्थित होते. 'मार्केट यार्डातील बाजार आवारात देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था, महामँगो यांच्याकडून आंबा उत्पादक शेतकरी ते ग्राहक अशी संकल्पना मांडण्यात आली. गेले २५ वर्ष पुण्यात आंबा महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. या महोत्सवात १५० शेतकरी सहभागी झाले आहेत. या महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहक आणि आंबा उत्पादक शेतकरी यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे. मुंबई आणि दिल्लीतही आंबा महोत्सवाचे आयाजेन केले जाणार आहे. या महोत्सवात कोकणातील हापूस, केशर, पायरी, तसेच विविध वाणांचे आंबे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. हापूसला भौगोलिक मानांकन (जीआय टॅगिंग) मिळाले आहे. मानांकनामुळे ग्राहकांना अस्सल हापूस मिळणार आहे. फसवणुकीची शक्यता अजिबात नाही,' असे रावल यांनी नमूद केले. 'राज्य शासनाच्या 'मॅग्नेट' प्रकल्पाच्या माध्यमातून फळे, भाजीपाला, फुले विक्रीची शृंखला निर्माण करण्यात येणार आहे. जागतिक पातळीवर सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती राज्यात स्थापन करण्यात येणार आहे. ही बाजार समिती जल, विमान वाहतुकीने जोडण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पणन मंडळाकडून मिलेट महोत्सव, आंबा महोत्सव, काजू , बेदाणे महोत्सव अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे', असे त्यांनी सांगितले. संजय कदम यांनी प्रास्ताविक केले. विनायक कोकरे यांनी आभारप्रदर्शन केले.

# कीबोर्ड दुरुस्त करण्याच्या बहाण्याने विद्यार्थिनीच्या डेस्ककडे जाऊन चुकीचा स्पर्श

**पुणे :** पुणे शिक्षणाचं माहेर घर मानलं जातं. पण याच शिक्षणाच्या माहेरघरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थिनी खरंच सुरक्षित आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. त्यामागे कारणही तसंच आहे. पुण्यात गुन्हेगारीच्या घटना एकीकडे प्रचंड वाढलेल्या आहेत. काही दिवसांपूर्वी सणासुदीच्या काळात टोळी युद्धाचा भडका उडालेला बघायला मिळाला होता. त्यानंतर गुंड निलेश घायवळच्या टोळीतील आरोपींनी दोन सर्वसामान्य नागरिकांवर जीवघेणा हल्ला केल्याचा प्रकार समोर आला होता. हेही असे की थोडे आता एका महाविद्यालयात टेक्निशियनकडून विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे पुण्यात अराजकतेचं कृत्य करणाऱ्यांना कोणतही भय राहिलेलं नाही का? असा प्रश्न उपस्थित होतोय.





विशेष म्हणजे शिक्षणाच्या महेरघरात विद्यार्थिनी कॉलेज प्रशासनाकडून सुरक्षित आहेत का? असा प्रश्न आहे. एकीकडे वाढती प्रेमी युगलांची संख्या पाहता विविध प्रकार घडतानाच्या घटना समोर येत असतातच. मात्र या शिक्षणाच्या महेरघरात विद्यार्थ्यांना सुरक्षा देण्याचं काम हे त्या प्रशासनाचा असतो. पण असं असलं तरी कुंपनच शेत खात असल्याचा प्रकार समोर आला आहे. कॉलेजच्या प्रशासनात असलेल्या एका इसमाकडूनच विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. पुण्यात एका नामांकित महाविद्यालयात प्रॅक्टिकल दरम्यान कॉलेजच्या टेक्निशियनकडून विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात अंबादास वैद्य असे आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर भा.दं.सं. ३१७/२०२५ बीएनएस अंतर्गत विनयभंगाचा गुन्हा पर्वती पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी वैद्य हा कॉलेजमध्ये टेक्निशियन म्हणून कार्यरत होता. घटनेच्या वेळी कॉम्प्युटर लॅबमध्ये दोन विद्यार्थिनी प्रॅक्टिकल देत होत्या. त्यावेळी आरोपीने कीबोर्ड दुरुस्त करण्याच्या बहाण्याने पीडित विद्यार्थिनीच्या डेस्ककडे जाऊन तिच्या अंगाला अनुचित स्पर्श केला. हा प्रकार पाहून तिची सोबत असलेली मैत्रीण घाबरून क्लासरूमच्या बाहेर धावली आणि मदतीसाठी आरडाओरडा केला.

घटनेनंतर पीडित विद्यार्थिनीने हा प्रकार कॉलेज प्रशासनाला तसेच आपल्या पालकांनाही सांगितला. त्यानंतर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपीवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यानंतरही कॉलेज प्रशासनाने आरोपीविरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही. अंबादास वैद्य हा अद्याप कॉलेजमध्ये संगणक विभागात काम पाहत असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाची भूमिका आणि जबाबदारीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## पळून लग्न केलं, दीड वर्षातच प्रेमाचा भयंकर शेवट

**झाशी :** एका प्रेमविवाहाचा दुर्दैवी अंत झाला आहे. दीड वर्षांपूर्वी प्रेमाचे वचन घेतलेल्या नात्याचा कधी असा अंत होईल असा कोणी विचारही केला नसेल. उत्तर प्रदेशातील झाशी येथील अलिगोल खिडकी परिसरात राहणाऱ्या २१ वर्षीय मेहक तिच्या खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. मेहकने सुमारे दीड वर्षांपूर्वी पळून जाऊन विवेक अहिरवार याच्याशी लग्न केलं होतं. मेहकच्या पालकांनी सासरच्यांवर हत्येचा आरोप केला आहे



मृत मेहकती आई गुडियाने आरोप आहे की तिचा जावई विवेक आणि त्याचे कुटुंब सतत तिचा छळ करत होते. अखेर तिला मारून टाकलं. झाशी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवलं.मेहकची आई गुडियाने सांगितलं की, तिची मुलगी लहानपणापासूनच आनंदी आणि मिलनसार होती. विवेक अहिरवार हा त्यांच्या शेजाऱ्याच्या घरी वारंवार येत असे. तिथे त्यांची भेट झाली आणि हळूहळू त्यांची मैत्री प्रेमात बदलली. ७ मार्च २०२४ मध्ये विवेक माझ्या मुलीसोबत पळून गेला. आम्ही पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली, पण कोणतीही कारवाई झाली नाही. सुमारे दोन महिन्यांनंतर आम्हाला कळले की त्यांचे लग्न झाले आहे आणि ते इम्लीपुरा परिसरात भाड्याच्या घरात राहत आहेतलग्नानंतर काही महिने सर्व काही सुरळीत सुरु होते, परंतु नंतर विवेक आणि त्याच्या कुटुंबाने मेहककडे पैशांची मागणी करण्यास सुरुवात केली असा आरोप आहे. जेव्हा त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तेव्हा मेहकला मारहाण आणि मानसिक छळ करण्यात आला.


## दारुच्या नशेत तर्राट, लागोपाठ ६ वाहनांना धडक

**पुणे :** दारूच्या नशेत गाडी चालवणाऱ्या पोलीस कॉन्स्टेबलने सहा वाहनांना धडक देत अनेकांना गंभीर जखमी केलं आहे. ही धक्कादायक घटना पुणे–नगर महामार्गावर रविवारी रात्री घडली. रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला कॉन्स्टेबल हेमंत इनामे रविवारी रात्री एका पार्टीमध्ये भरपूर दारू प्यायल्यानंतर आपल्या कारने पुणे–नगर रस्त्यावर वेगाने वाहन चालवत होता. या दरम्यान त्याने नियंत्रण गमावून एकूण सहा वाहनांना धडक दिली, ज्यात अनेक लोक गंभीर जखमी झाले आहेत.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. मात्र, रांजणगाव पोलिसांनी केवळ गुन्हा दाखल करून इनामेला अटक केली नाही. तसेच त्याची वैद्यकीय तपासणीही करण्यात आलेली नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. या प्रकरणात ग्रामीण पोलिसांनी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. त्यामुळे पोलीस दलावर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं असून, निष्पक्ष तपासाची मागणी होत आहे.

## हमासने ओलीस ठेवलेल्या बिपिन जोशीची हत्या, बॉडी पाठवली

**नवी दिल्ली :** हमासने ओलीस ठेवलेला नेपाळचा हिंदू तरुण बिपिन जोशी याला इस्रायली अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले आहे. हमासने ओलीस धरलेल्या चार जणांचे मृतदेह पाठवल्यानंतर ही घोषणा करण्यात आली. बिपिन जोशी याचे पार्थिव तेल अवीव येथे आणले जात असून डीएनए चाचणीनंतरच त्याची ओळख पटवली जाईल. त्यानंतर ते नेपाळला पाठवले जाईल. बिपिन जोशी हे हमासने ओलीस ठेवलेले एकमेव- बिग इस्रायली जिवंत व्यक्तींपैकी एक होते.इस्रायलमधील नेपाळचे



राजदूत धन प्रसाद पंडित यांनी नेपाळी माध्यमांना सांगितले की, बिपिन जोशी यांचे पार्थिव तेल अवीव येथे आणले जात आहे. बिपिनच्या पार्थिवाबाबत आम्हाला हमासकडून माहिती मिळाल्याचे पंडित म्हणाले.इस्रायली अधिकारी डीएनए चाचणी करून बिपीन जोशी याची ओळख पटवतील. ओळख पटल्यानंतरच त्याचे पार्थिव नेपाळला पाठवले जाईल. नेपाळला पाठवण्यापूर्वी इस्रायली सरकारकडून अंतिम संस्कार केले जातील. नेपाळी दूतावासाच्या मदतीने पार्थिव मायदेशी पाठवले जाईल. बिपिन जोशी हा हल्ल्याच्या एक महिना आधी नेपाळहून इस्रायलला आला होता. तो गाझा सीमेवरील किबुत्झ अलुमिम येथे शेतीचे शिक्षण घेण्यासाठी आणि काम करण्यासाठी आला होता. या उपक्रमातील १७ नेपाळी विद्यार्थ्यांपैकी १० जणांचा हल्ल्यात मृत्यू झाला. बिपिन जोशी बॉम्ब शेल्टरमध्ये असताना काही ग्रेनेड बाहेर फेकण्यात यशस्वी झाला होता. यात तो जखमी झाला आणि त्याला ओलीस ठेवण्यात आले. बिपीन जोशीची १७ वर्षीय बहीण पुष्पा जोशी आपल्या भावाला सोडवण्यासाठी पश्चिम नेपाळहून काठमांडूला आठ तास बस प्रवास करून अधिकाऱ्यांना विनवणी करण्यासाठी गेली होती.ऑगस्टमध्ये बिपिन जोशीचे कुटुंब इस्रायलला गेले होते.

## कुटुंबीय पोहोचण्यापूर्वीच प्रेमीयुगुल कारमध्ये मृत

**लखनऊ :** एका प्रेमीयुगुलाने विष प्राशन करुन आपल्या आयुष्याची अखेर केली. या घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी त्यांना रुग्णालयात नेले, जिथे उपचारादरम्यान त्या दोघांचाही मृत्यू झाला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतले आणि पोस्टमॉर्टमसाठी पाठवले आहेत. ही घटना रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास गोसाईगंज पोलीस स्टेशन परिसरातील आउटर रिंग रोडवर घडल्याची माहिती आहे.लखनऊ येथील या जोडप्याने रस्त्याच्या कडेला त्यांची कार पार्क केली आणि त्याच गाडीत विष प्राशन केले. त्यांची प्रकृती बिघडल्यानंतर त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांना याची माहिती दिली आणि लोकेशन पाठवलं. माहिती मिळताच कुटुंबीय घटनास्थळी पोहोचले आणि दोघांनाही रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, त्यांना वाचवता आलं नाही. मृत प्रियकराची ओळख २१ वर्षीय सुभाष रावत अशी झाली आहे. तर, त्यांची प्रेयसी १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी होती जी सध्या दहाव्या वर्गात शिकत होती. दोघांमध्ये दीर्घकाळापासून प्रेमसंबंध होते असे वृत्त आहे.

## पत्नीला संपवलं, नंतर चाकूसह पोलीस ठाण्यात पोहोचला पती

**सोलापूर :** शहरातील जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना घडली आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला चाकूने भोसकून ठार केलं आहे. सुहास तुकाराम सिद्धगणेश (रा. तळेहिप्परगा सोलापूर) असं संशयित आरोपीचं नाव असून यशोदा सुहास सिद्धगणेश असं मृत महिलेचं नाव आहे. ही घटना सोलापूर शहरातील न्यू बुधवार पेठ मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली आहे.अन्नपूर्णा बाळशंकर(वय ५० वर्ष) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुहास सिद्धगणेश हा अनेक महिन्यांपासून पत्नी यशोदा याच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्यामुळे दोघा पती–पत्नीत तक्रार होत होती. मंगळवारी सकाळी या तक्रारीचे भांडणात रूपांतर झाले आणि दोघांच्या संसाराचा भयंकर शेवट झाला. सुहासने पत्नीला ठार करून थेट पोलीस स्टेशन गाठले आणि पोलिसांना हकीकत सांगितली. रक्ताने माखलेले कपडे आणि हातात चाकू पाहून पोलिसांना धक्काच बसला. यशोदाच्या आईने



आणि बहिणीने तिला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत यशोदा यांची बहीण अन्नपूर्णा बाळशंकर यांनी सोलापुरातील जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यशोदा सिद्धगणेश ही अनेक दिवसांपासून एका मुलीला सोबत घेऊन सोलापूर शहरात पतीपासून विभक्त राहत होती. मंगळवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास यशोदा सिद्धगणेश हिच्या घरातून जोरात ओरडण्याचा आवाज येत होता. त्यावेळी अन्नपूर्णा बाळशंकर यांनी यशोदाच्या घरात आत डोकावून पाहिलं असता यशोदा लोखंडी बेडजवळ जमिनीवर खाली पडलेली होती व सुहास सिद्धगणेश हा त्याच्या हातातील चाकूने यशोदा हिच्या पोटात व गळ्यावर वार करुन चाकू खुपसत होता. अन्नपूर्णा बाळशंकर यांनी आरडाओरडा करुन यशोदा हिच्या जवळ जात जाण्याचा प्रयत्न केला. सुहास याने हातात चाकू घेऊन म्हणाला की, 'आमच्या मध्ये कोणी आला तर, मी सर्वांना खल्लास करुन टाकीन' अशी धमकी देत यशोदाला खुपसतच राहिला. काही वेळाने हातामध्ये चाकू घेऊन सुहास सिद्धगणेश हा घरातून निघून गेला. हातामध्ये असलेला चाकू रक्ताने माखलेला होता. अन्नपूर्णा यांनी आरडाओरडा करुन आजूबाजूच्या लोकांना गोळा केले. यशोदा ही रक्ताचे थोरोळ्यात निपचित पडली होती.

# पंजाब किंग्जची विजयाची हॅट्रिक!

## प्रियांश- प्रभसिमरनने पाया रचला, श्रेयसने चढवला विजयाचा कळस

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

आयपीएल २०२६ स्पर्धेतील १७ वा सामना पंजाब किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांअखेर २१९ धावांचा डोंगर उभारला होता. पंजाब किंग्जला हा सामना जिंकण्यासाठी २२० धावांचा भलामोठा डोंगर सर करायचा होता. या आव्हानाचा पाठलाग करताना आधी प्रियांश आर्य, मग प्रभसिमरन सिंग आणि शेवटी कर्णधार श्रेयस अय्यरने नाबाद अर्धशतकी खेळी करुन ६ गडी राखून दमदार विजय मिळवून दिला. हा पंजाबचा सलग तिसरा विजय ठरला आहे.

या सामन्यात पंजाब किंग्जचा संघ २२० धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात आला होता. त्यामुळे पंजाब किंग्जला पावरप्लेमध्ये चांगल्या सुरूवातीची गरज होती. ही सुरुवात प्रभसिमरन सिंग आणि प्रियांश आर्यने करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ९९ धावा जोडल्या. पावरप्लेच्या षटकांमध्ये दोघांनी मिळून ९३ धावा जोडल्या. प्रियांश आर्यने २० चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकांरांच्या साहाय्याने ५७ धावांची खेळी केली. तर प्रभसिमरन सिंगने



२५ चेंडूत ५१ धावा केल्या. तर कुपर कॉनोलीने ११ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यरने ३३ चेंडूत नाबाद ६९ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ५ चौकार आणि ५ षटकार खेचले. त्याला शशांक सिंगने चांगली साथ दिली. यासह पंजाबने २२० धावांचा यशस्वी पाठलाग करून ६ गडी राखून विजय मिळवला.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना सनरायझर्स हैदराबादने २० षटकांअखेर २१९ धावा केल्या होत्या. या हैदराबादला देखील पावरप्लेमध्ये चांगली सुरुवात मिळाली होती. अभिषेक शर्माने २८ चेंडूत ७४ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ५ चौकार आणि ८ षटकार खेचले. तर ट्रॅव्हिस हेडने २३ चेंडूत ३८ धावांचे योगदान दिले. कर्णधार इशान किशनने २७ धावा केल्या. तर हेनरिक क्लासेनने ३९, अनिकेत वर्माने १८ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर हैदराबादने २१९ धावांचा डोंगर उभारला होता.

या सामन्यात अभिषेक शर्मा आणि प्रियांश आर्य या दोन्ही फलंदाजांनी वेगवान अर्धशतकं झळकावली. पहिल्या डावात फलंदाजी करताना अभिषेक शर्माने १८ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं. तर दुसऱ्या डावात फलंदाजी करताना प्रियांश आर्यने १५ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं.

## स्टब्सने रागात हेल्मेट फेकलं, दिल्लीचे खेळाडू अंपायर्सवर संतापले; नेमकं काय घडलं?

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धेतील १८ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. चेन्नईने या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना २१२ धावा केल्या होत्या. २१३ धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्ली कॅपिटल्सकडून ट्रिस्टन स्टब्सने एकाकी झुंज दिली. पण तो ६० धावांवर बाद होऊन माघारी परतला. यादरम्यान १९ व्या षटकात ग्लोव्हजची अदलाबदली करण्यावरून चांगलाच वाद पेटला. ज्यावरून ट्रिस्टन स्टब्स नाराज दिसून आला. स्टब्स बाद होऊन माघारी पटल्यानंतर करुण नायर आणि नितीश राणा यांनी अंपायर्ससोबत वाद घातला. नेमकं काय घडलं? जाणून घ्या.

तर झाले असे की, २१२ धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेला दिल्लीचा संघ विजयाच्या दिशेने वाटचाल करत होता. त्यावेळी दिल्लीला विजयासाठी १२ चेंडूत ३२ धावा करायच्या होत्या. ट्रिस्टन स्टब्स आणि कुलदीप यादवची जोडी मैदानावर होती. पहिल्या चेंडूवर लेग बाय स्वरूपात एक धाव मिळाली. त्यानंतर पुढचा चेंडू वाईड होता. पुढील चेंडू निर्धाव राहिला. त्यानंतर ट्रिस्टन स्टब्स ३८ चेंडूत ६० धावांची खेळी करून माघारी परतला. त्याने ४ चौकार आणि ३ षटकार खेचले.

ट्रिस्टन स्टब्स चांगल्याच फॉर्ममध्ये होता. याचा फायदा घेत त्याने दिल्लीला विजयाच्या अगदी जवळ पोहोचवलं होतं. ज्या चेंडूवर ट्रिस्टन स्टब्स बाद झाला. त्या चेंडूच्या आदल्या चेंडूवर ट्रिस्टन स्टब्सला आपले




ग्लोव्हज बदलायचे होते. ओम चौथ्या अंपायरने ग्लोव्हज बदलू दिले नाही. त्यामुळे बाद होऊन माघारी जात असताना तो संताप व्यक्त करताना दिसून आला. ड्रेसिंग रुममध्ये गेल्यानंतर त्याने रागात हेल्मेट फेकलं. त्यामुळे नितीश राणा आणि करुण नायर अंपायरसोबत वाद घालताना दिसून आले. ट्रिस्टन स्टब्सला नवे ग्लोव्हज हवे होते. पण अंपायरने ग्लोव्हज बदलू देण्याची अनुमती दिली नाही. त्यावेळी दिल्ली संघाचे डायरेक्टर वेणुगोपाल राव देखील संताप व्यक्त करताना दिसून आले. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

## आशियाई बॅडमिंटन स्पर्धा : अग्रमानांकिताला नमवत आयुष शेट्टी पोहोचला अंतिम फेरीत

■ निंगबो (चीन)/वृत्तसंस्था

भारताच्या आयुष शेट्टीने आशिया अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेतील स्वप्नवत घोडदौड कायम राखताना अंतिम फेरीत धडक मारली. आयुषने शनिवारी झालेल्या उपांत्य लढतीत गतविजेता आणि अग्रमानांकित कुन्लावत वितिदसर्न याच्यावर १०-२१, २१-१९, २१-१७ असा शानदार विजय मिळवला. विजेतेपदासाठी आयुषची गाठ आता द्वितीय मानांकित शी यू क्यू याच्याशी पडेल. दुसऱ्या उपांत्य फेरीत शी यू क्यू याने तैपेइच्या चौथ्या मानांकित चाऊ टिएन चेन याचा २१-९, २१-१३ असा पराभव केला.

उपांत्य लढतीत आयुषला सुरुवातीला संघर्ष करावा लागला. वितिदसर्नने वेगवान आणि अचूक खेळाच्या जोरावर पहिल्या गेमला ४-० अशी आघाडी घेतली. गेमच्या मध्याला वितिदर्सन याने आघाडी ११-५ अशी भक्कम केली आणि त्यानंतर पहिला गेम सहज जिंकला. दुसऱ्या गेममध्ये मात्र आयुषने आत्मविश्वासाने खेळ केला. वितिदसर्नने गेममध्ये परतण्यासाठी प्रयत्न करताना पिछाडी १३-११ अशी भरून



काढली. मात्र, आयुषने संयम ढळू दिला नाही आणि दुसरा गेम जिंकून सामना निर्णायक तिसऱ्या गेममध्ये नेला. तिसऱ्या गेममध्ये आयुषने आक्रमकता कायम ठेवताना खेळाला बचावाची सुरेख जोड दिली. त्यापुढे वितिदसर्न निष्प्रभ ठरला. आशियाई स्पर्धेत यापूर्वी दिनेश खन्ना हे पुरुष एकेरीची अंतिम फेरी गाठणारे आणि विजेतेपद मिळविणारे पहिले भारतीय खेळाडू होते. खन्ना यांनी १९६५ मध्ये अशी कामगिरी केली होती. त्यानंतर एकही भारतीय खेळाडू ही कामगिरी करू शकला नाही. २०२३ मध्ये सात्विक-चिराग जोडीने स्पर्धेत दुहेरीचे विजेतेपद मिळवले होते. एकेरीत मात्र भारताची प्रतीक्षा कायम होती.

## चेपॉकवर संजूचा 'हिट'शो ; दिल्लीला नमवत CSK ने विजयाचं खातं उघडलं

■ गुवाहाटी/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धेतील १९ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. चेपॉकच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने पहिल्या डावात फलंदाजी करताना २१२ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना दिल्लीच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण दिल्लीचा डाव १८९ धावांवर आटोपला. यासह चेन्नई सुपर किंग्जने हा सामना २३ धावांनी आपल्या नावावर केला.

दिल्लीला हा सामना जिंकण्यासाठी २१३ धावांचा डोंगर सर करायचा होता. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्लीकडून पथूम निसांका आणि केएल राहुलची जोडी मैदानावर आली. या जोडीने दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून ६१ धावा जोडल्या. केएल राहुल १८ धावा करून माघारी परतला. तर पथूम निसांकाने ४१ धावांची खेळी केली. समीर रिझवी ६ धावा करून माघारी परतला. कर्णधार अक्षर पटेलला १ धाव करता आली. डेव्हिड मिलरने १७ धावांचे योगदान दिले. ट्रिस्टन स्टब्सने दिल्लीला विजय मिळवून देण्यासाठी पूर्ण जोर लावला. पण तो ६० धावांवर झेलबाद होऊन माघारी परतला. आशुतोष शर्माने १९ धावा केल्या. पण दिल्लीचा डाव १८९ धावांवर आटोपला. यासह चेन्नईने हा सामना जिंकून गुणतालिकेत खातं उघडलं.

या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून सलामीला आलेल्या संजू सॅमसनने नाबाद ११५ धावांची खेळी केली. हे त्याचं चेन्नई सुपर किंग्ज संघासाठी पहिलं शतक ठरलं. तर कर्णधार ऋतुराज गायकवाड अवघ्या १५ धावा करून माघारी परतला. आयुष म्हात्रेला ५९ धावांवर रिटायर्ड हर्ट करून बाहेर पाठवलं. त्याच्या जागी शिवम दुबेला हिटिंगसाठी पाठवलं. त्याने १० चेंडूत २० धावा केल्या. यासह चेन्नईने २० षटकांअखेर २ गडी बाद २१२ धावा केल्या.

### चेन्नईचा पहिला विजय

ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला हवी तशी सुरुवात करता आलेली नाही. या स्पर्धेतील सुरूवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. पण चौथ्या सामन्यात दिल्लीला नमवून चेन्नईने विजयाचं खातं उघडलं आहे.



# ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन, आठ दशकांपासूनचा चिरतरुण आवाज काळाच्या पडद्याआड

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला आहे. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. आपल्या चिरतरुण आवाजाने सगळ्या जगाला भुरळ घालणाऱ्या आशा भोसले या आज काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. आशा भोसले यांच्या छातीत संसर्ग झाल्याने त्यांना शनिवारी रात्री उशिरा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आज आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी आशा भोसले यांच्या निधनाची माहिती दिली. उद्या दुपारी ४ वाजता आशा भोसले यांच्या पार्थिवावर अत्यंसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपटसृष्टी, गायन क्षेत्र आणि कला क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.





आशा भोसले यांचे चिरंजीव आनंद भोसले यांनी ही माहिती दिली की त्यांची आई आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन झालं आहे. आशा भोसलेंचे अवयव निकामी होत गेले, त्यामुळे त्यांचं निधन झालं. आशा भोसले यांना शनिवारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आज त्यांची प्राणज्योत मालवली आहे. उद्या सकाळी ११ ते २ या वेळेत त्या लोअर परळ या ठिकाणी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क या ठिकाणी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत अशी माहिती आनंद भोसले यांनी दिली.

आज संपूर्ण देश आणि महाराष्ट्र आकंठपणे दुःखात बुडाला आहे. एका युगाचा अंत झाला आहे, आपल्या आशाताई आपल्यातून निघून गेल्या आहेत. आशाताईंचं असणं हे वर्षानुवर्षे समाधानाची अनुभूती देत होतं. आपण दुःखाला कवटाळून लोकांना आनंद देणं ही त्यांची खासियत होती. त्यांचं कर्तृत्व जगाला वेड लावणारं होतं. अशा आशाताई आज आपल्यात राहिल्या नाहीत. आता कुटुंबाने सांगितल्याप्रमाणे उद्या त्यांचं पार्थिव त्यांच्या लोअर परळ येथील निवासस्थानी ठेवण्यात येईल. तिथे लोकांना अंत्यदर्शन घेता येईल. त्यानंतर शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात येतील. शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांचं नसणं हे आपल्याला आयुष्यभर दुःख देणारं आहे असं आशिष शेलार यांनी म्हटलं आहे. सांगली या ठिकाणी आशा भोसले यांचा जन्म झाला होता. वयाच्या १० व्या वर्षापासून त्यांनी गायनाला सुरुवात केली होती. गिनिज बुकात सर्वाधिक गाणी गाणारी गायिका अशी त्यांची नोंद झाली आहे. आपल्या वेगळ्या आवाजाची भुरळ सगळ्या जगाला पडली होती. त्या जरी आपल्याला सोडून गेल्या असल्या तरीही त्यांचं गाणं कायमच आपल्या सोबत राहणार आहे. तो आवाज कायमच आपल्याला साथ देईल यात शंका नाही.

## 'धुरंधर २'ने २४ दिवसांत केली 'इतक्या' कोटींची कमाई

गेल्या काही दिवसांपासून 'धुरंधरः द रिव्हेंज' या सिनेमाने धुमाकूळ घातला आहे. प्रदर्शित झाल्यापासून आदित्य धर दिग्दर्शित हा सिनेमा सिनेमागृहात राज्य करत आहे. या सिनेमाने अनेक सिनेमांचे रेकॉर्ड मोडले आहेत. फक्त भारतातच नाही, तर संपूर्ण जगभरात या सिनेमाची चर्चा सुरू आहे. संपूर्ण जगभरातून सिनेमाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

या चित्रपटाने शनिवारी म्हणजेच २४ व्या दिवशी १३.५० कोटींची कमाई केली. यांसह २४ दिवसांत या सिनेमाची भारतात एकूण कमाई १०६८.९२ कोटी इतकी झाली आहे. तर जगभरात या सिनेमाने एकूण १६९१.३० कोटींची कमाई केली आहे. आता या सगळ्यात 'धुरंधर २' म्हणजेच धुरंधरः द रिव्हेंज हा सिनेमा ओटीटीवर कधी प्रदर्शित होणार, याबद्दलही चर्चा होताना दिसत आहे.

सिनेमाची दररोज होणारी कमाई पाहता हा सिनेमा इतक्यात ओटीटीवर प्रदर्शित होणार नसल्याचे म्हटले जात आहे. धुरंधर हा सिनेमा नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला होता. पण, धुरंधर २ हा नेटफ्लिक्सवर नाही तर जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित होणार आहे. बी६२स्टुडिओ आणि जिओ हॉटस्टारने चित्रपटाची निर्मिती केली आहे. त्यामुळे, धुरंधर २ हा सिनेमा जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित होणार आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, चित्रपट निर्माते सिनेमा लगेच ओटीटीवर प्रदर्शित करणार नाहीत. ८ आठवडे सिनेमा चित्रपटगृहांमध्ये दाखवला गेल्यानंतर तो सिनेमा ओटीटीवर दाखवला जाऊ शकतो. पण, सिनेमा फक्त आठ आठवडेच दाखवला गेला पाहिजे असे नाही. त्यापेक्षाही अधिक काळ सिनेमा चित्रपटगृहांत दाखवला जाऊ शकतो. सध्या सिनेमा बॉक्स ऑफिसवर उत्तम कमाई करत असल्याने तो आणखी काही काळ थिएटरमध्ये दाखवला जाईल.

## नाटकाचा माहोल पुन्हा अनुभवतेय; अभिनेत्री स्वरूप संपत २५ वर्षांनी पुन्हा रंगभूमीवर

तू च माझी सुमी, 'महासागर' बघायला आलेले नाटकाचे लेखक जयवंत दळवी मला भेटायला आत आले तेव्हा त्यांनी उच्चारलेले हे शब्द आणि माझ्या अभिनयाची केलेली तारीफ ऐकून इतका आनंद झाला होता की, मी सांगूच शकत नाही. कारण गुजराती रंगभूमीवरचं ते माझं मुख्य भूमिका असलेलं पहिलं नाटक होतं. या नाटकानं जणू जादू केली आणि मी मुख्य भूमिका करायला लागले." स्वरूप संपत गप्पा मारताना सांगत असतात तेव्हा त्यांच्या डोळ्यासमोर भूतकाळ लख्ख जागा झालेला दिसतो.




गप्पांचं निमित्त असतं, त्यांच्या आगामी हिंदी नाटकाचं. गजेंद्र अहिरे लिखित-दिग्दर्शित 'जाने पहचाने अनजाने' या नाटकाचा आज (१२ एप्रिल) 'वर्ल्ड प्रीमिअर' 'एनसीपीए'मधील 'टाटा थिएटर' येथे होतो आहे. स्वरूप संपत आज २५ वर्षांनी पुन्हा एकदा रंगमंचावर येत आहेत, यातली आणखी एक योगायोगाची गोष्ट म्हणजे १८ व्या वर्षी त्यांनी पहिल्यांदा रंगमंचावर पदार्पण केलं होतं आणि आता ६८ व्या वर्षी, त्या पुन्हा एकदा चेहऱ्याला 'रंग' लावून सज्ज झाल्या आहेत. त्या सांगतात, "रंगभूमी हे माझं पहिलं प्रेम आहे. वडील बच्चु संपत हा गुजराती रंगभूमीवरचा बापमाणूस. त्यांच्या तालमीत तयार झालेल्या मला रंगमंचावर आणि मागेही अनेक गोष्टी करायला लागायच्या. पुन्हा एकदा मी तो सारा माहोल अनुभवते आहे. यानिमित्ताने दौरे करायला मिळणार, लोकांना भेटता येणार याचाच आनंद जास्त आहे. मला ही प्रक्रियाच जास्त आवडते. म्हणजे जसं हे नाटक माझ्यापर्यंत आलं, आवडलं... मग तुमचा प्रत्यक्ष सहभाग सुरू होतो... तालमी सुरू होतात, सुरुवातीला बसूनच, मग मात्र उभं राहून... नंतर दिग्दर्शक त्यात नाट्य भरतो, तुमचा रंगमंचावरचा चालता-बोलता वावर सुरू होतो... मग संगीतकार सूर-तालाची जोड देतो आणि काल संगीताशिवाय केलेली तालीम आज अचानक वेगळ्याच उंचीवर पोहोचते... नंतर 'लाइट्स'ने रंगभूमी उजळते. त्या प्रकाशात तुमच्यातला कलाकार अधिकच सावध होतो. प्रेक्षकांना सामोरं जायची वेळ नजीक आल्याचं जाणवतं. हुरहुर वाढू लागते. नंतर वेशभूषाकार येतो – कोणत्या प्रवेशात कोणती साडी नेसणार, माझ्या हातातली पिशवी अशी हवी, पर्स अशी हवी... मग शेवटी येतो रंगभूषाकार... चेहऱ्यावर रंग लावून तुम्ही नाटकासाठी पूर्णतः सज्ज होता... पुन्हा एकदा हा अनुभव किती 'एक्सायटिंग'ना." स्वरूप यांच्या आवाजातला उत्साह लपत नाही. त्या उत्साहातच हे नाटक स्वीकारण्यामागचं कारणही सांगितलं.

# तो ती आणि फुजी : समकालीन जाणिवांचं यथार्थ चित्रण

समकालीन विषय आणि जाणिवांचं भान असणारी मंडळी एकत्र आली की त्यातून घडणारी कलाकृती ही आपल्या जगण्याच्या जवळची वाटते. विशेषतः तरुण पिढीचं जगणं, त्यांच्या महत्त्वाकांक्षा, नात्याच्या-करिअरच्या रुढ चौकटी मोडू पाहणारा त्यांच्यातला बंडखोरपणा आणि त्यातून कधी विसविशीत होणारं आयुष्य, चुकांमधून सावरल्यावर उसवलेली वीण पुन्हा घट्ट बांधण्याचा त्यांचा प्रयत्न हे विषय लेखिका इरावती कर्णिक यांच्या लेखणीतून ताकदीने येतात आणि ते पडद्यावर तितक्याच प्रामाणिकपणे उतरवणं ही दिग्दर्शक मोहित टाकळकर यांची हातोटी आहे. 'मीडियम स्पायसी'नंतर या जोडीने पुन्हा एकदा 'तो ती आणि फुजी'सारखा एक सुंदर चित्रपट दिला आहे. वर्तमानातली परिस्थिती, त्याला भूतकाळाचा असलेला संदर्भ आणि भविष्यात दिसणाऱ्या वेगवेगळ्या शक्यता अशा पध्दतीने मांडलेला 'तो' आणि 'ती'च्या कथेचा पट या चित्रपटात पाहायला मिळतो. पूर्णपणे भिन्न कौटुंबिक पार्श्वभूमी असलेले दोघंजण, सुरुवातीची मैत्री, मग नवथर प्रेम, एकमेकांमध्ये आकंठ बुडून जावं असं वाटणारं हे प्रेम पुढे आयुष्यभरासाठी निभवता येईल का? या विचाराने एकत्र राहून बघणं, एकमेकांचा एकत्र सुरु असलेला कामाचा संघर्ष आणि या सगळ्यात समज-गैरसमज, त्यातून तुटत गेलेला संवाद अशा सगळ्या प्रवासातून गेलेले हे दोघं खूप वर्षांनी अवचितपणे जपानमध्ये भेटतात.

त्या एका भेटीत इतक्या वर्षांचं अंतर सहज गळून पडतं, पण पुन्हा त्याच प्रेमाने नातं सांधलं जावं इतकं सरळसोपं आयुष्य राहिलेलं नाही. या गुंतागुंतीचा धागा त्या दोघांच्या भूतकाळातच आहे. त्यामुळे वर्तमानातली जपानमधली त्यांची भेट, तिचं आजचं वास्तव समजल्यानंतर ते स्वीकारताना होणारी त्याची घालमेल आणि त्या प्रत्येक प्रसंगानुरुप भूतकाळातले उलगडत जाणारे संदर्भ अशा दोन्हींची वीण घालत ही कथा आपल्याला पुढे नेत जाते.



'तो ती आणि फुजी' या चित्रपटाची मांडणी ही सगळ्याच अर्थाने मराठीतल्या आजवरच्या चित्रपटांपेक्षा भिन्न आहे. मोहित टाकळकर यांची दिग्दर्शनाची शैली ही नेहमीच वास्तवाच्या जवळ जाणारी आहे. या चित्रपटात त्याचा प्रभाव अधिक जाणवतो. मोजकेच संवाद, आवश्यक तेवढेच संदर्भ, कुठलाच फापटपसारा नसलेल्या या मांडणीत पडद्यावरच्या त्या दोन पात्रांच्या बोलण्या-वागण्यातून, त्यांच्या वावरण्यातून सगळं काही पाहणाऱ्याला समजत जातं. मग कधी त्यांचा अवकाश हे पुण्यातलं जुन्या पद्धतीचं भलंमोठं घर असेल, पुण्यातलं त्यांचं आवडतं जपानी रेस्टॉरंट असेल की मग जपानमधलं तिचं आखीवरेखीव, नेटकं घर असेल.

जपानमध्ये चित्रीकरण होतं आहे म्हणून तिथलं सौंदर्य टिपायला हवं, तिथले लोक-संस्कृती हे सगळं पाहणाऱ्याला दिसायला हवं असाही सोस या चित्रपटात नाही. तिथल्या रस्त्यावरून एकमेकांशी बोलत जाणाऱ्या या दोघांच्या आजूबाजूने जितकं आवश्यक तितकंच जपान तुम्हाला दिसतं. माऊंट फुजीचा उल्लेख इथे महत्त्वाचा आहे, कथेतलं एक छोटेखानी पात्रच जणू... त्याची रचना ही चित्रपटातल्या या दोघांच्या नात्याशी जोडणारी आहे. एकमेकांविषयीच्या गढूळलेल्या भावना आत कुठेतरी दडवून पुढचा प्रवास झालेला आहे, त्यामुळे ती सगळी गुंतागुंत निवळून लख्ख खरं काय ते पाहण्यासाठी लागणारी अंतदृष्टी ही त्या फुजीच्या पर्वताशी प्रतिकात्मतेने लेखिकेने जोडली आहे. भयंकर असा ज्वालामुखी पोटात दडवून बसलेला फुजीचा पर्वत बाहेरून तितकाच शांत, सुंदर दिसतो. चित्रपटाचा शेवटही असाच... नव्या शक्यतांकडे नेणारा, तोही प्रेक्षकांच्या जाणिवा-नेणिवांवर सोडलेला आहे.

अकृत्रिम मांडणी ही या चित्रपटाची खरी ताकद आहे. अकृत्रिमता दिग्दर्शकीय मांडणीत आहे, संगीतात आहे आणि कलाकारांच्या अभिनयातही आहे. चेहऱ्याला रंग नाही, कुठलेही फिल्टर नाहीत, अशा पध्दतीने ललित प्रभाकर आपल्याला इथे दिसतो. सळसळतं चैतन्य आणि उत्साहाने भरलेला, चटकन निर्णय घेणारा, पुढे काय याचा फारसा विचार न करणारा, अत्यंत हळवा, व्यवहाराशी काडीमोड घेतलेला अशा त्याच्या स्वभावछटा ललितने खूप छान रंगवल्या आहेत. त्याउलट ती अत्यंत व्यवहारी आहे, सजग आहे, पण प्रेमाच्या बाबतीत ती सुध्दा जीवाला जीव देणारी आहे.

# माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा उत्साहात संपन्न

**जनसंचलन/ बुलढाणा**

माझे गाव आरोग्य संपन्न गावफ्फ अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा व आढावा सभा येथील वैद्यकीय महाविद्यालयात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. बैठकीत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती वाढविणे तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर विशेष भर देण्यात आला. जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांनी आरसीएच कार्यक्रमांतर्गत एचपीव्ही () लसीकरणाचा तालुकानिहाय आढावा घेत उद्दिष्टपूर्तीसाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. तर जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचा आढावा घेत संबंधित कामकाजाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी रणजीत मंडाले यांनी विविध आरोग्य कार्यक्रम व जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागात सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे, वृत्तपत्रे आणि यशोगाथांचा प्रभावी वापर करण्यावर विशेष भर देण्यात आला. तसेच कमी प्रगती असलेल्या कार्यक्रमांमध्ये सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. डब्ल्यूएचओचे डॉ. सम्यक खौरे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शन केले. बैठकीत तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी अभियानाशी संबंधित कामकाजाबाबत सादरीकरण केले. या प्रसंगी सर्व तालुका आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी शिवराज चौहान, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी धुतडमल, अनिल लोखंडे व सुनील लोखंडे उपस्थित होते.

# विकासकामांत अडथळ्यांचा आरोप; सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांना प्रत्युत्तर!

**जनसंचलन/ सिंदखेड राजा**

ऐतिहासिक नगरीचा कायापालट करण्यासाठी शहरात कोट्यवधींच्या निधीतून विविध विकासकामे सुरू असताना विरोधकांकडून राजकीय द्वेषातून अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप सत्ताधारी गटाने पत्रकार परीषदेतून केला. सर्व कामे पारदर्शक असून, कोणत्याही चौकशीला घाबरत नाही, असे स्पष्ट करत, विरोधकांचे आरोप फेटाळण्यात आले. पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्टाचाराच्या आरोपांबाबत सत्ताधाऱ्यांनी सांगितले की, संबंधित काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (एमजेपी) तांत्रिक देखरेखीखाली सुरू आहे. रॉक एक्स्कॅव्हेशन व पाइपलाइन मोजमाप त्रयस्थ संस्थेमार्फत तपासले जात असून, निकृष्ट कामाला मंजुरी मिळण्याचा प्रश्नच नसल्याचे नमूद करण्यात आले. मोजमाप पुस्तिका अभियंत्यांमार्फत राजकारण न करता तांत्रिक पुरावे सादर करण्याचे केले आव्हान पत्रकार परिषदेत माहिती देताना सत्ताधारी गट. भरली जाते, त्यात राजकारणाला स्थान नसते. विरोधकांनी केवळ आरोप न करता ठोस तांत्रिक पुरावे सादर करावेत, असे आव्हानही देण्यात आले. भुयारी गटार योजनेवर होत असलेल्या टीकेलाही सत्ताधाऱ्यांनी प्रत्युत्तर दिले. काम पूर्ण होण्यापूर्वीच त्याला अपयशी ठरवणे चुकीचे असून, रस्ते उकरल्यामुळे नागरिकांना होणारा त्रास तात्पुरता असल्याचे सांगितले. रस्ते दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आली असून, शहर स्वच्छतेच्या दृष्टीने ही योजना महत्त्वाची असल्याचे नमूद केले. पाणी शुद्धीकरणासाठी वापरले जाणारे ब्लिचिंग पावडर व अन्य साहित्य शासनाच्या निकषांनुसार नामांकित कंपन्यांकडून निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी केले जाते. पाण्याचे नमुने वेळोवेळी तपासले जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले; मात्र विरोधकांकडून जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करून राजकारण केले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. पत्रकार परिषदेला नगराध्यक्ष सौरभ तायडे, योगेश म्हस्के, ग्रामसेवा रामदासी बारवकर, कृष्णा मेहेत्रे, ॲड. संदीप मेहेत्रे, दिलीप आढाव व अन्य उपस्थित होते.

# डोणगावात घरफोडी; १.७३ लाखांचे दागिने लंपास

**जनसंचलन/ डोणगाव**

येथील खंडोबा परिसरात अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून सुमारे १ लाख ७३ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना ९ ते १३ एप्रिलदरम्यान घडली असून, पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, वार्ड क्रमांक २ मधील खंडोबा परिसरात राहणारे डॉ. गजानन प्रल्हादराव पातुरकर हे घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. या कालावधीत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील बेडरूममधील कपाटातील सोन्याचे दागिने लंपास केले. चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये सोन्याच्या विविध अंगठ्या, झुमके, रिंग, नथ, तसेच सुमारे २० ग्रॅम वजनाचे गंठण यांचा समावेश आहे. या दागिन्यांची एकूण किंमत सुमारे १ लाख ७३ हजार रुपये घरातील साहित्य असे अस्ताव्यस्त होते. असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणी डॉ. पातुरकर यांच्या तक्रारीवरून घरफोडीचा गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस कर्मचारी संजय धिके करत आहेत.



दरम्यान, प्रत्यक्ष बाजारभावानुसार चोरीस गेलेल्या सोन्याची किंमत अधिक असल्याचा दावा संबंधितांनी केला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, डोणगावात पुन्हा चोरट्यांची हालचाल वाढल्याची चर्चा सुरू आहे

# जिल्ह्यात ८ ते १४ एप्रिल दरम्यान सामाजिक समता सप्ताह; विविध लोककल्याणकारी कार्यक्रमांचे आयोजन

**जनसंचलन/ बुलढाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात दि. ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. जिल्ह्यामध्ये या सप्ताहाचे नियोजन करण्यात आले असून, समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

या सप्ताहाची सुरुवात आज करण्यात आली असून सामाजिक न्याय विभागाच्या योजनाची माहिती पत्रकार परिषदेच्या माध्यमातून देण्यात आली. ९ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगे महाराज यांच्या विचारांवर जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळा व वसतिगृहामध्ये निबंध, वक्तृत्व आणि लघुनाट्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल. १० एप्रिल रोजी समतादूतांच्या माध्यमातून पथनाट्ये सादर करून सामाजिक न्याय विभागाच्या मार्जिन मनी योजनेसह इतर महत्वाच्या योजनांचे प्रबोधन केले जाईल. ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रम तसेच संविधान जागर अंतर्गत भारतीय संविधानाची माहिती व महिला मेळाव्याचे आयोजन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलाविषयक कार्य अधोरेखित केले जाईल. १३ एप्रिल रोजी शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळेत रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान व जात पडताळणी प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल, ज्यामध्ये मान्यवरांची व्याख्याने व चर्चासत्रे होतील. या सर्व उपक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

# लोणी गवळी येथील घटनेनंतर खरात यांची शाळेला भेट!



**मेहकर**

लोणी गवळी येथील जिल्हा परिषद शाळेत घडलेल्या गंभीर आणि संतापजनक घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सिद्धार्थ खरात यांनी रविवारी अचानक शाळेला भेट देत प्रशासनाला धारेवर धरले. महिला पालकांच्या तक्रारींच्या अनुषंगाने परिस्थितीचा आढावा घेत त्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत दोषींना कोणतीही माफी नसून, कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा दिला. घटनेनंतर भीतीच्या छायेत असलेल्या पालकांनी आमदारांना माहिती देत घडलेल्या प्रकाराबाबत रोष व्यक्त केला. यावेळी आमदारांनी पालकांशी थेट संवाद साधत त्यांना न्याय मिळवून देण्याची ग्वाही दिली. संबंधित प्रकरणात पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला पुराव्यांच्या आधारे कठोर शिक्षा होईल, अशी माहिती त्यांनी दिली. शाळेतील सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर येताच, आमदारांनी प्रशासनाबद्दल नाराजी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे ठणकावत त्यांनी तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. शाळेत शिक्षकांची कमतरता असल्याचे लक्षात येताच दोन महिला शिक्षकांची तातडीने नियुक्ती करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या आहाराबाबतही गंभीर तक्रारी समोर आल्याने आमदारांनी सध्याच्या खिचडी पुरवठादाराला बदलण्याचे आदेश दिले. मुलांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना माफी नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे नमूद करत, आमदार खरात यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.

# आपल्याच माणसांनी केलेला अराजकीय सत्कार सर्वात मोठा सन्मान- आ. सौ. श्वेता महाले पाटील...

## चिखली विधानसभेतील त्रिमूर्तींचा बुलढाणावासीयांकडून भव्य सत्कार संपन्न

जनसंचलन/बुलढाणा

श्रद्धा, कृतज्ञता आणि आपुलकीचे अनोखे वातावरण आज कला महाविद्यालय, चिखली येथे अनुभवास आले. श्री. शरद शिक्षण व युवक कल्याण संस्था, चिखली आणि सत्यमेव जयते अर्बन को-ऑप. क्रे. सो. लि., बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने चिखली विधानसभा मतदारसंघातील त्रिमूर्तींचा आ. सौ. श्वेताताई महाले पाटील, मा. मुख्यमंत्री महोदयांचे खासगी सचिव मा. श्री. विद्याधरजी महाले आणि चिखलीचे नगराध्यक्ष मा. श्री. पंडितराव देशमुख यांचा भव्य सत्कार समारंभ संपन्न झाला. चिखली व बुलढाण्यातील मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते आणि मान्यवर या सोहळ्यास उपस्थित होते. मनोगत व्यक्त करताना आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी उपस्थितांच्या हृदयाला भिडणारे विचार मांडले. त्या म्हणाल्या, मोठ्या व्यासपीठांवरून मिळणाऱ्या पुरस्कारांपेक्षा आपल्याच भूमीतील, आपल्याच माणसांनी दिलेला अराजकीय सत्कार माझ्यासाठी सर्वाधिक मोलाचा आहे. चिखली आणि बुलढाणा म्हणजे माझे घर आहे, इथले प्रत्येक कार्यकर्ते, प्रत्येक नागरिक म्हणजे माझे कुटुंब आहे. या कुटुंबाने आज माझ्यावर जो प्रेमाचा वर्षाव केला, तो मला आयुष्यभर प्रेरणा देत राहील.द्बद्ब राजकारण हे सत्तेसाठी नव्हे, तर सेवेसाठी असते. जेव्हा आपल्या भूमीतील लोक आपल्या कामाची दखल घेतात, तेव्हा मनाला खरा आनंद होतो. हा स्नेह म्हणजेच आमच्या कार्याची खरी पावती आहे, असे त्या पुढे म्हणाल्या. आमदार सौ. महाले पाटील यांनी सत्काराला उत्तर देताना प्राचार्य विष्णुपंत पाटील यांच्याशी लहानपणापासून असलेल्या ऋणानुबंधाचा आवर्जून उल्लेख केला. त्यांच्याकडूनच राजकारणाचे बाळकडू मला मिळाले, त्यामुळे ते माझ्यासाठी आदर्श आहेत, असे त्यांनी सांगितले. हा सत्कार कोणताही राजकीय सत्कार नसून आपल्या माणसांनी आपल्या माणसांचा केलेला निर्मळ सत्कार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



राजकारण व समाजकारण करताना पदोपदी संघर्ष करावा लागला, परंतु देवाभाऊंच्या म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आणि चिखली विधानसभा मतदारसंघाच्या सर्वंकश विकासासाठी अहोरात्र झटत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नळ योजना, गावातील रस्ते, अंगणवाड्या, समाज मंदिरे अशा अनेक कामांसाठी पक्षाशी एकनिष्ठ राहून काम केल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. युतीमध्ये काम करणाऱ्यांनी सर्वांनीच महायुतीचा धर्म पाळला पाहिजे. वैचारिक बांधिलकी ठेवूनच आपल्या पक्षाचा विकास साधायला हवा, असेही त्यांनी ठणकावून सांगितले. शेवटी करवंड येथे छत्रपती शिवाजी महाराज व गुणवंताबाई यांच्या विवाहस्मृतींना उजाळा देणाऱ्या कार्यक्रमास सर्वांनी यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

---

## दगडवाडी (ता. देऊळगावराजा) येथे भीषण आग लाखोंचे नुकसान, ७ जखमी; मोठा अनर्थ टळला...

जनसंचलन/देऊळगावराजा

दगडवाडी येथे शुक्रवार, १० एप्रिलच्या मध्यरात्री शॉर्टसर्किटमुळे एका घराला अचानक भीषण आग लागून मोठे नुकसान झाले. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. शेजारील नागरिक सौंदा उगलमुगले यांनी धूर आणि ज्वाळा दिसताच तत्काळ गावकऱ्यांना सतर्क केले. सरपंच पती यांनी तातडीने पोलीस निरीक्षक ब्रह्मगिरी यांच्याशी संपर्क साधून अग्निशामक दलाला पाचारण केले. अवघ्या १५ ते २० मिनिटांत अग्निशामक गाडी घटनास्थळी दाखल झाली. दरम्यान, गावकऱ्यांनी सुरुवातीला बाटल्या व पाण्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र याच वेळी घरातील गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाला. या स्फोटात घरावरील पत्रे व मोठमोठे दगड दूरवर फेकले गेले, ज्यामुळे मदत करणाऱ्या नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला. या घटनेत आर्यन शंकर घुगे याला डोक्याला गंभीर दुखापत होऊन १८ टाके



पडले, तर इतर सहा जण किरकोळ जखमी झाले. घरातील धान्य, कागदपत्रे, कपडे व इतर साहित्य पूर्णतः जळून खाक झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अग्निशामक दल आणि पोलिसांच्या वेळीच हस्तक्षेपामुळे आग आटोक्यात आली व पुढील मोठा अनर्थ टळला. घर मालक कारभारी दिपाजी नागरे यांचे घर पूर्णतः उद्ध्वस्त झाले आहे. गावात या घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे.

## आमदार नव्हे, सेवेकरी सिद्ध! कुटे यांच्या कृतीने जिंकली मने...

### २ हजार वऱ्हाडींच्या साक्षीने पार पडला थाटामाटात विवाह

जनसंचलन/ सोनाळा

समाजकारणाला प्राधान्य देत आमदार नव्हे, सेवेकरीपफ्र ही भावना जपणारे आ. डॉ. संजय कुटे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. पितृछत्र हरवलेल्या पल्लवी या मुलीचे त्यांनी सहपत्नीक कन्यादान करत मानवतेचा अनोखा आदर्श घालून दिला. संत नगरी काटेल येथे १० एप्रिल रोजी तब्बल २ हजार वऱ्हाडींच्या उपस्थितीत हा विवाह सोहळा दिमाखात पार पडला. पल्लवीचे वडील दिलीपराव काळमेघ यांचे काही महिन्यांपूर्वी निधन झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत असलेल्या या कुटुंबाला डॉ. कुटे व डॉ. अपर्णाताई कुटे यांनी आधार देत पल्लवीला दत्तक घेतले.



केवळ दत्तकच नव्हे, तर तिच्या विवाहाची संपूर्ण जबाबदारी उचलून त्यांनी पित्याची उणीव भरून काढली. विवाह सोहळ्यात भावनिक क्षणांचा संगम पाहायला मिळाला. एका बाजूला वडिलांच्या आठवणींचे दुःख, तर दुसरीकडे नवजीवनाची सुरुवात अशा वातावरणात उपस्थितांनी वधू-वरांना आशीर्वाद दिले. कुटे दाम्पत्याच्या या कार्यामुळे जळगाव जामोद मतदारसंघात माणुसकीचा दीप अधिक तेजाने प्रज्वलित झाला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८